संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# आधुनिक वैद्यकशास्त्राच्या डोळयात झणझणीत अंजन

बदलत्या कालानुसार एकूणच सामाजिक आरोग्याचे स्वरूपही बदलले आहे. एकेकाळी निरोगी समाज असावा. यासाठी कटाक्षाने काही उपाय केले जायचे.प्रामुख्याने त्याकाळी जीवनशैलीवर विशेष भर दिला जात असे. त्यात पहाटे लवकर उठण्यापासून ते रात्री लवकर झोपण्यापर्यंतच्या उपाययोजना केल्या जात असत. ऋतूमानानुसार आहारविहारावर मर्यादा घातल्या जात असत. उपास तापासाच्या माध्यमातून शरीर स्वस्थ ठेवण्याचा प्रयत्न होत असे. तरीदेखील त्या काळात काही असाध्य रोग होत असत. त्यावर आजच्या इतके प्रभावी उपाय नव्हते ही गोष्ट खरी. परंतु असाध्य रोग होण्याचे प्रमाण कमी होते. आज असाध्य लोकांवर अगदी खात्रीशिर उपाय उपलब्ध आहेत. परंतु अशा असाध्य लोकांची संख्या असंख्य झाली आहे. वाढती लोकसंख्या विविध प्रकारचे वाढते रोग आणि अपुरी पडणारी एकूणच आरोग्य व्यवस्था त्याचा गैरफायदा घेऊन याच आरोग्य व्यवस्थेचे झालेले व्यापारीकरण अशा सगळ्या समस्या आज सर्वत्र पहायला मिळतात.

भारतामध्ये आजही खेड्यापाड्यात काहीवेळेला तर शहरातसुध्दा डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत. दवाखाने असले तरी तिथे पुरेशा सोयीसुविधा नसतात. मुळातच डॉक्टरांची संख्या लोकसंख्येच्या तुलनेत बरीच कमी आहे. अशावेळी वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या कोणत्याही उपचार पध्दतीला समान वागणूक मिळणे ही खरे तर आजच्या काळाची गरज आहे. परंतु आधुनिक वैद्यकशास्त्र ज्याला मॉडर्न मेडिसीन म्हटले जाते, ज्यामध्ये ॲलोपॅथीची उपचार पध्दती वापरली जाते. हीच एकमेव आणि खात्रीची आरोग्यवरची उपाययोजना आहे असा प्रचार केला जातो. आधुनिक वैद्यकशास्त्राचा प्रचार आणि प्रसार मोठा आहे. त्यामध्ये होणारे संशोधन व्यापक स्वरूपाचे असते आणि मग ती उपचारपध्दती परिणामकारकही ठरते. परंतु याचा अर्थ आयुर्वेदिक, युनानी किंवा होमिओपॅथी या आरोग्यावरच्या उपचार पध्दतीचे नाहीत किंवा त्या मागासलेल्या किंवा बुरसटलेल्या आणि निरुपयोगी आहेत असा जो प्रचार आधुनिक वैद्यक शास्त्राचे लोक करतात त्यांना पहिल्यांदाच जोरदार झटका देण्याचे काम सर्वोच्च न्यायालयाने केले. आणि आधुनिक वैद्यक शास्त्र म्हणजेच ॲलोपॅथीचे उपचार आयुर्वेदिक आणि युनानीचे डॉक्टरसुध्दा करू शकतील असे स्पष्ट शब्दांत निर्देशही दिलेले आहेत. याचा फायदा आयुर्वेदिक डॉक्टरांना होण्यापेक्षाही खेड्यापाड्यातल्या असंख्य सामान्य लोकांना योग्यवेळी योग्य उपचार योग्यवेळी होईल आणि डॉक्टरांनासुध्दा आपल्याकडे आलेल्या रुग्णांवर उपचार करणे सोपे जाईल.

## आरोग्य सेवेच्या संधी महत्त्वाच्या

खरे तर आयुर्वेदिक आणि होमिओपॅथीक हे इतके प्राचीन वैद्यकशास्त्र आहे की, त्याचा आजही हजारो वर्षे होऊनही अनेक रोगांवर उपयोग होतो. बऱ्याचवेळेला तर ॲलोपॅथीचे उपचार करून थकलेले रुग्ण शेवटचा उपाय म्हणून आयुर्वेदाकडे वळतात आणि त्यातून ते बरेही होतात. आयुर्वेदिक अभ्यासक्रमामध्ये काळाप्रमाणे काही प्रमाणात मॉडर्न मेडिसिसी किंवा आधुनिक शास्त्र शिकवले जाते. शरीर शास्त्राबरोबरच विविध व्याधींवरचा अभ्यास करून घेतला जातो. ॲलोपॅथी आणि आयुर्वेदिक यातला मुलभूत फरक असा आहे की, ॲलोपॅथीतून रुग्णाला तात्पुरते बरे केले जाते. पण रोगाचे समुळ उच्चाटन होईल किंवा भविष्यकाळात रुग्णाची प्रतिकारशक्ती वाढेल असे कोणतेही हमखास उपाय होत नाहीत. आयुर्वेदात मात्र याच गोष्टीवर जास्त भर दिला जातो. रोगाचे मूळ शोधून तो पुन्हा पुन्हा होणार नाही असा बंदोबस्त केला जातो. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे उपचार करत असताना आयुर्वेदामध्ये औषधांबरोबच रुग्णाचा मानसशास्त्रीय अभ्यास केला जातो. ॲलोपॅथित रुग्णाच्या मानसिक अवस्थेला फारसा थारा दिला जात नाही.

रोग आणि त्याच्यावर औषधांचा मारा हेच त्याचे प्रधान तत्त्व असते. खरे तर या दोन्ही उपचारपध्दतीचा नीट समन्वय साधला गेला तर, कोणत्याही प्रकारचा रुग्ण आणि रोग खात्रीक्षीरपणे उपाय होऊ शकतात. या दृष्टिकोनातून सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निकाल मोलाचा ठरतो. आयुर्वेदिक किंवा युनानीचे डॉक्टर्स ॲलोपॅथीचा वापर करू शकतील, असा निकाल दिला जात असताना खरे तर, ॲलोपॅथीच्या डॉक्टरांनीसुध्दा स्वत:बद्दल अहंगंड न बाळगता आयुर्वेदिक आणि युनानी उपचार पध्दतीचा वापर केला पाहिजे.त्याच समन्वयाची भूमिका दाखवून उपचार करण्याचे कौशल्य दाखवले पाहिजे. आज वस्तुस्थिती अशी आहे की, धकाधकीच्या एकूण जीवनशैलीमध्ये ॲलोपॅथी पूर्णपणे भरोशाची राहिलेली नाही. केवळ त्याचे मार्केट मोठे असल्यामुळे प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केला जातो.

## सरकारी रुग्णालयात आयुर्वेदाला स्थान हवे

सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निकाल आयुर्वेदिक किंवा युनानीच्या डॉक्टरांना दिलासा देणारा आहे, असे एकांगी चित्र न उभे करता ॲलोपॅथी किंवा आधुनिक वैद्यकशास्त्राचा टेंभा मिरवणाऱ्यांना आत्मपरीक्षण करायला लावणारा आहे. न्यायालयाच्या या निकालाची महाराष्ट्र सरकारनेसुध्दा तातडीने दखल घेतली पाहिजे. यापूर्वी महाराष्ट्र सरकारने आयुर्वेदिक आणि युनानीच्या डॉक्टरांना ॲलोपॅथीची परवानगी दिली होती. परंतु त्याविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशनने आक्षेप घेतल्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट झाले होते. आता एकाअर्थी महाराष्ट्र सरकारच्या भूमिकेबाबत सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. हे लक्षात घेऊन सगळ्या सरकारी रुग्णालयांमध्ये आयुर्वेदिक उपचार पध्दतीची समसमान तत्त्वावर उभारणी केली पाहिजे. सरकारी रुग्णालयांमध्ये जितक्या जागा एमबीबीएस झालेल्या डॉक्टरांच्या भरल्या जातात तितक्याच जागा आयुर्वेधिक, युनानी किंवा होमिओपॅथीच्या भरल्या पाहिजेत. सरकारी रुग्णालयाचा अधिष्ठाता आयुर्वेदिक एमडी झालेला डॉक्टरही नियुक्त केला पाहिजे. तरच रुग्णांना एकाच ठिकाणी एकाच वेळी हमखास उपचाराची हमी मिळू शकेल. केरळसारख्या राज्यामध्ये आयुर्वेदिक उपचार पध्दतीला सरकारी पातळीवरून इतके प्रोत्साहन दिले जाते की, आज जगातले अनेक लोक केरळमधले आयुर्वेदिक उपचार घेण्यासाठी येत असतात. हे केरळचे उदाहरण तर आधुनिक वैद्यकशास्त्राच्या मंडळींच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे आहे.